दिनांक १३/०९/२०२६

# न्यूज बुलेटिन

## शिक्षक अभियोग्यता व बुद्धिमत्ता चाचणी -२०२५ मध्ये दुबार परीक्षा दिल्याबाबत प्रसार माध्यमांमध्ये व्हायरल होत असलेल्या बातमीबाबत.

१. पवित्र पोर्टलमार्फत TAIT -२०२५ मध्ये ६४ उमेदवारांनी एकापेक्षा अधिक वेळा परीक्षा दिली आहे व त्यांची पोर्टलमार्फत निवड झाल्याची माहिती काही प्रसार माध्यमांमध्ये व्हायरल होत असल्याचे दिसून आले, त्याबाबत पडताळणी केली असता असे दिसून येते की, या यादीत दर्शविण्यात आलेल्या ६४ उमेदवार यांच्या नावामध्ये साधर्म्य आढळून येत असल्याने प्रथम दर्शनी सदर उमेदवार एकच असल्याचे दिसून येते. परंतु त्यांच्याबाबतच्या अधिक माहितीशी उदा. आधार क्रमांक, जन्मतारीख, आईचे नाव, ई-मेल क्रमांक, मोबाईल क्रमांक इत्यादी बाबींवरून पडताळणी केली असता सदर उमेदवार वेगवेगळे असल्याचे दिसून येत आहे.

२. वरील बाबी विचारात घेऊन याबाबत TAIT-२०२५ दिलेल्या सर्व उमेदवारांनी दुबार परीक्षा दिल्याबाबत पडताळणी करण्यात आली आहे.

३. शिक्षक अभियोग्यता व बुद्धिमत्ता चाचणी-२०२५ च्या वेळी उमेदवारांनी अपूर्ण अर्ज, चुकीचे अर्ज अशा विविध कारणास्तव अनेक अर्ज केले असले तरी उमेदवारास कोणत्याही एकाच ठिकाणी परीक्षा देता येईल व उर्वरित प्रवेश पत्र जमा करण्याच्या सूचना उमेदवारांना प्रवेश पत्रावर देण्यात आलेल्या होत्या, त्यामुळे उमेदवारांना कोणत्याही परिस्थतीत दुबार परीक्षा देता येणार नाही.

४. तथापि, काही उमेदवार माहिती लपवून अथवा माहिती तफावत दाखवून दिशाभूल करून निवड प्रक्रियेत सहभागी झाल्याचे आढळून आल्यास/निदर्शनास आणून दिल्यास पडताळणी अंती अशा उमेदवाराची निवड झाली असल्यास कोणत्याही टप्प्यावर नियुक्ती प्राधिकारी यांचेकडून रद्द केली जाईल, याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

---------oooooo--------